**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३७/२०२०** | **दिनांक ०८/०५/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२/०५/२०२० ते ०८/०५/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९/०५/२०१९ सकाळी ८:३० पासून १३/०५/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/०५ | ०३/०५ | ०४/०५ | ०५/०५ | ०६/०५ | ०७/०५ | ०८/०५ | | ०९/०५ | १०/०५ | ११/०५ | १२/०५ | १३/०५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ४ | ३ | १५ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३४ | ३६ | ३६ | ३५ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २८ | २८ | २८ | २८ | २८ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | ३ | २ | २ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६९ | ७० | ६५ | ६७ | ६६ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २८ | २७ | २७ | २८ | २८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ३ | ५ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | वा.प. | नै.प. | आ.द. | नै. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ११ ते १३ मे २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल व किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश अंशतः ढगाळ राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कोविड-१९ बाबत शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता** | - | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे.<br>• शेतीतील सर्व कामे करताना शेतकऱ्यांनी / शेतमजुरांनी तोंडाला मास्क लावावे तसेच एकमेकांमध्ये ४-६ फुट अंतर राहील याची दक्षता घ्यावी. ठराविक वेळाने साबणाने हात स्वच्छ धुवावेत.<br>• जेवताना, विश्रांती घेताना, शेतमाल गाडीत चढवत तसेच उतरवत असताना दोन व्यक्तींमध्ये ४-६ फूट अंतर राहील असे पहावे. शेतात काम करतांना कामगारांची जास्त गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• कोविड-१९ चा संसर्ग आढळून आलेल्या भागामध्ये शक्यतो शेतीमध्ये यंत्राचा वापर केल्यानंतर १ टक्का सोडियम हायपोक्लोराईड या निर्जंतुकाचा वापर करून यंत्रे निर्जंतुक करून ठेवावी तसेच शेतमाल साठवून ठेवायच्या गोण्या व इतर साहित्य वापरण्यापूर्वी १ टक्का सोडियम हायपोक्लोराईडचे द्रावण वापरून निर्जंतुक करून घेणे आवश्यक आहे.<br>• पिक संरक्षण व पोषक अन्नद्रव्यासंदर्भात फवारणी करताना उपकरणे हाताळणे, द्रावण तयार करणे, फवारणी करणे व उपकरणे धुवून ठेवणे याविषयी पुरेशी खबरदारी घ्यावी.<br>• शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना शासनाने नेमून दिलेल्या नियमांचे पालन करावे. |
| **फळ प्रक्रिया** | - | • कोव्हीड-१९ अर्थात कोरोनाच्या उद्रेकामुळे उत्पादित फळांचे विपणन करण्यात अडचण निर्माण झाली असल्याने शेतीमालाचे नुकसान कमी करण्यासाठी फळ प्रक्रिया केल्यास फळांचे नुकसान कमी करता येणे शक्य आहे. यामध्ये कच्च्या आंब्यापासून लोणचे आणि चटणी, फणसापासून तळलेले गरे, फणस पोळी इ., उपलब्ध पक्व काजू बोंडापासून सिरप, करवंदापासून लोणचे, चटणी आणि सिरप इ., पिकलेल्या कोकमापासून आमसूल, सिरप आणि आगळ इ., जांभूळापासून सिरप आणि चिकू फळापासून चिकू पावडर इत्यादी टिकावू पदार्थ तयार करून संभाव्य नुकसान काही प्रमाणात कमी करता येईल.<br>• सदर फळप्रक्रिया बाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील फार्मर कॉर्नर या उपविभागामध्ये उपलब्ध आहे (www.dbskkv.org.in). |
| **उन्हाळी भात** | **पक्वता** | • दिनांक ११ ते १३ मे, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने तयार झालेल्या भात पिकाची सकाळच्या वेळेस जमिनीलगत कापणी व मळणी करून भात सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| **खरीप भात** | **पूर्वतयारी** | • खरीप भात लागवडीसाठी जमिनीची नांगरट करून जमीन उन्हात तापू द्यावी यामुळे तणांचा बंदोबस्त होण्यास मदत होईल.<br>• खरीप भात लागवडीसाठी आपल्या आवश्यकतेनुसार भात बियाण्यांची उपलब्धता करून घ्यावी.<br>• डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने रत्नागिरी-१, रत्नागिरी-२, रत्नागिरी-३, रत्नागिरी-७, कर्जत-३ व कर्जत-५ जाड दाण्यांसाठी, रत्नागिरी-४, रत्नागिरी-५, रत्नागिरी-६, रत्नागिरी-२४, फोंडाघाट-१, पालघर-१, पालघर-२, कर्जत-२, कर्जत-६, कर्जत-७, कर्जत-८, कर्जत-९, कर्जत-१० तसेच सह्याद्री, सह्याद्री-२, सह्याद्री-३, सह्याद्री-४ आणि |

| | | |
|---|---|---|
| | | सह्याद्री-५ संकरीत भात बारीक दाण्यांसाठी, कर्जत-४ अतिशय बारीक दाण्यासाठी भाताच्या जाती कोंकण विभागात खरीप लागवडीसाठी शिफारसीत केल्या आहेत.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी एकरी २० ते २४ कि.ग्रॅ., बारीक व अतिशय बारीक दाण्याच्या जातीसाठी एकरी १४ ते १६ कि.ग्रॅ. आणि संकरीत जातीसाठी एकरी ८ कि.ग्रॅ. बियाणे वापरावे.<br>• बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी कृषी विद्यापिठाच्या बियाणे बिभागाच्या ८२७५०१३३९६ या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. |
| **आंबा** | **फळधारणा** | • दिनांक ११ ते १३ मे, २०२० दरम्यान हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत काढणी करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान १५ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• आंबा बागेत फळमाशी तसेच फळे पोखरणारी अळी इ. किडीच्या प्रादुर्भावामुळे गळलेली फळे वेळोवेळी गोळा करून नष्ट करावीत व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• आंब्यांच्या झाडावर खोड किडीचा प्रादुर्भाव झाडाचे खोड व फांद्यावर दिसून येतो ही कीड फांद्या पोखरत असल्याने पोखरलेल्या फांद्या वाळू लागतात. किडीच्या सर्वेक्षणासाठी बागेतील झाडांची नेहमी पाहणी करावी. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी तारेच्या हुकाने खोडातील अळ्या काढून टाकून छिद्रात प्रवाही क्लोरपायरीफॉस २० टक्के १० मि. ली. + ५० मि. ली. रॉकेलचे मिश्रण इंजेक्शनच्या सहाय्याने ओतावे आणि छिद्र बुजवून घ्यावे. झाडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये व इजा झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावून जखम झाकावी. |
| **आंबा घन लागवड** | **-** | • आंबा फळांची काढणी झाल्यावर घन लागवड (५ x ५ मी. किंवा ६ x ४ मी.) असलेल्या आंबा बागांमध्ये नियमित छाटणी करावी. या मध्ये उंची कमी करणे, फांद्या एकमेकांमध्ये गेल्या असल्यास छाटणे आणि वाळलेल्या फांद्या काढून टाकणे या गोष्टींचा अंतर्भाव करावा. घन लागवड असलेल्या बागांमधील कलमांची उंची दोन ओळींच्या अंतराच्या ८०% इतकी ठेवावी. |
| **काजू** | **फळधारणा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• काजू बागेतील वाळलेल्या, रोगट फांद्या काढून बागेत स्वच्छता ठेवावी. फांद्या काढलेल्या भागावर बोर्डो पेस्ट लावावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी.<br>• नारळावरील इरीओफाईड कोळीच्या प्रादुर्भावामुळे फळाच्या देठाखालच्या भागात पांढरट, पिवळे, त्रिकोणी चट्टे दिसून येतात. प्रादुर्भित भागावरील फळांचे आवरण तडकते परिणामी नारळ लहान राहतात तसेच लहान फळांची गळ होते. या किडीच्या प्रभावी व्यवस्थापनेसाठी नारळ बागेत स्वच्छता ठेवावी, पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे, नारळाच्या आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे तसेच ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. अधिक ७.५ मि.ली. पाणी मिसळून वर्षातून तीन वेळा (ऑक्टोबर ते नोव्हेंबर, जानेवारी तो फेब्रुवारी आणि एप्रिल ते मे) मुळाद्वारे द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. याशिवाय नारळावर १ टक्का कडुनिंबयुक्त कीटकनाशक (निमाझोल) ४ मि.ली. प्रती लिटर पाण्यातून नारळाच्या घडावर पडेल अशी फवारणी करावी. फवारणी करण्यापूर्वी सर्व किडग्रस्त व तयार नारळ काढून घ्यावेत. पडलेले फळे, फुलोरा गोळा करून नष्ट करावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.<br>• चिकू फळातील बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी चिकू बागेतील किडग्रस्त तसेच गळलेली सर्व फळे गोळा करून जाळून नष्ट करावीत आणि बाग स्वच्छ ठेवावी. |
| **दुभती जनावरे** | **-** | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांवर गोचीडांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी गोठयाची स्वच्छता राखावी व पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली डेल्टामेथ्रीन २ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून संपूर्ण अंगावर द्रावण फवारावे. जनावरे औषध चाटणार नाही, याकरिता फवारणी पूर्वी जनावराला पाणी पाजावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या**

**शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**
**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**